# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE
नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**


**दिनांक १३.०८.२०२६ गुरुवार**

## १) बाल न्याय अधिनियम व पोक्सो कायद्याबाबत जनजागृती कार्यशाळा संपन्न :

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, होप फॉर चिल्ड्रन इंडीया आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालया अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने बाल न्याय अधिनियम व बालकांचे लैंगिक अपराधांपासुन संरक्षण अधिनियम याबाबत जनजागृती कार्यशाळा दिनांक १२.०८.२०२६ रोजी पोलीस भवन येथील ऑडोटोरीयम येथे नागपूर शहर व ग्रामिण पोलीस विभागातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बाल पोलीस अधिकारी, चाईल्ड हेल्पलाईन, बालकल्याण समिती आणि बाल न्याय मंडळ यांचेकरीता आयोजीत करण्यात आली होती.

कार्यशाळेमध्ये बालकांचे हक्कांचे संरक्षण, बालकांवरील लैंगिक अत्याचारास प्रतिबंध, संबंधीत कायदेशीर तरतुदी तसेच बालकांशी संबंधीत प्रकरणांमध्ये विविध यंत्रणांची भुमिका व जबाबदाऱ्या याबाबत कार्यशाळेमध्ये सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री मुश्ताक पठान यांनी बाल संरक्षण व्यवस्थेची सद्यस्थिती व बालकांच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या विविध विभागामधील समन्वय तसेच बालकांशी संबंधीत प्रकरणांमध्ये प्रभावी कार्यवाही करण्याबाबत माहिती दिली.

कार्यशाळेमध्ये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या श्रीमती गितांजली बुटी, पोलीस आयुक्त, नागपूर शहर श्री विश्वास नांगरे पाटील, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती भाग्यश्री कोठावळे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य श्री संजय सेंगर, होप फॉर चिल्ड्रन फाऊंडेशनचे श्री परम आनंद आणि श्री वारीस शेख यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले.

श्री विश्वास नांगरे पाटील, मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी उपस्थीतांना संबोधीत करतांना बालकांशी संबंधीत प्रकरणांमध्ये कायदेशीर तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्याबरोबरच पोलीसांनी बालकांप्रती अधिक संवेदनशिल आणि बालककेंद्रीत दृष्टीकोन ठेऊन कार्य करावे असे आवाहन केले.

कार्यशाळेत सर्व मान्यवर यांनी बालकांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी संबंधीत कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, बालकांचे हक्कांबाबत व्यापक जनजागृती तसेच विविध शासकीय व संबंधीत यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. बालकांचे सुरक्षिततेसाठी पोलीस विभाग, महिला व बालविकास विभाग, बाल न्यायमंडळ, बाल कल्याण समिती, चाईल्ड हेल्पलाईन तसेच स्वयंसेवी संस्थानी संवेदनशिलपणे व समन्वयाने काम करावे असे आवाहन करण्यात आले. कार्यशाळेदरम्यान बालकांचे संरक्षणाप्रती जनजागृती करणाऱ्या पोस्टरचे विमोचन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. या माध्यमातुन बालकांचे हक्कांचे संरक्षण, सुरक्षित वातावरण व बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध याबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यशाळेस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या श्रीमती गितांजली बुटी, पोलीस आयुक्त, नागपूर शहर श्री विश्वास नांगरे पाटील, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती भाग्यश्री कोठावळे, अध्यक्ष बाल कल्याण समिती, नागपूर श्रीमती छाया राऊत, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री राजेंद्र दाभाडे, पोलीस उपआयुक्त, गुन्हेशाखा श्री दीपक अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामिण श्री अनिल मस्के, पोलीस उपआयुक्त, विशेषशाखा श्री रमेश धुमाळ, विभागीय उपआयुक्त महिला व बालविकास,नागपूर विभाग श्रीमती अपर्णा कोल्हे, जिल्हा व महिला व बालविकास अधिकारी, नागपूर श्री सुनिल मेसरे तसेच महाराष्ट्र राज्य बाल

हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य श्री संजय सेंगर, होप फॉर चिल्ड्रन फाऊंडेशनचे श्री परम आनंद यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळा कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन सरंक्षण अधिकारी श्रीमती साधना हटवाल यांनी केले.









## २) रिजनल ट्रॅफिक एक्सीलेन्स सेंटरचे उद्घाटन संपन्न :

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिलेल्या निवेदनावरुन, विदर्भ प्रभाग वाहतुक प्रशिक्षण उत्कृष्टता केंद्र (आरटीईसी) ला मान्यता मिळालेली आहे. विदर्भ प्रभागातील नागपूर, अमरावती शहर, नागपूर परिक्षेत्रातील गोंदीया, भंडारा, गडचिरोली, वर्धा, चंद्रपुर, नागपूर ग्रामिण, अमरावती परिक्षेत्रातील यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलढाणा, अमरावती ग्रामिण या जिल्हयातील कार्यरत वाहतुक पोलीस अधिकारी व अंमलदार यांना वाहतुक नियंत्रण, नियमन तसेच व्यवस्थापनाचे उत्कृष्ट प्रशिक्षण मिळावे, वाहतुक नियमांचा प्रचार व प्रसार होऊन वाहतुक नियम पाळण्याविषयी जागरुकता निर्माण व्हावी, सर्व घटकांना याचा लाभ घेता यावा व जनतेला उत्कृष्ट सेवा प्रदान करता यावी या उद्येशाने विदर्भ प्रभागातील वाहतुक पोलीसांना आयआरटीई व नागपुर शहर वाहतुक विभागातील रस्ता सुरक्षा दल यांचेकडून वाहतुक अभियांत्रिकी नियंत्रण व नियमन बाबत प्रशिक्षण याद्वारे पोलीस नियंत्रण कक्षाजवळील ट्रॅफीक इंजिनियरींग इंस्टीटयुट येथे देण्यात येणार आहे.

मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे मार्गदर्शना खाली आज दिनांक १३.०८.२०२६ रोजी मा. पोलीस उपआयुक्त, वाहतुक, नागपूर शहर श्री आदित्य मिरखेलकर, यांचे हस्ते प्रशिक्षणाचे प्रथम सत्राचे उद्घाटन करण्यात आलेले आहे. प्रथम सत्रामध्ये विदर्भातील ६० वाहतुक पोलीस सहभागी झालेले होते. प्रशिक्षणाचा कार्यभार रस्ता सुरक्षा दलाचे पोलीस निरीक्षक नितीन पतंगे व त्यांची टिम तसेच आयआरटीई प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षक हे सांभाळणार आहेत.

 

**३) मा. न्यायालयातुन आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १३.०८.२०२६ रोजी मा. जिल्हा न्यायाधीश—९ व अति. सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. एस. जी. बोरलेपवार साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ६४४/२०२४ मधील, पोलीस ठाणे कोतवाली येथील अप. क्र. २७५/२०२४ कलम १०३(१),३१५(२) भान्यासं या गुन्ह्यातील आरोपी कुशल उर्फ इंगा दत्तात्रय शेंडे वय ३३ वर्षे, रा. नवाबपुरा, करण अपार्टमेंट, पहिला माळा, फ्लॅट क्र. १, त्रनागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम १०३(१)** भान्यासं **कायद्यान्वये आजन्म कारावासाची शिक्षा व १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महिने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक १७.०८.२०२४ चे १६.३० वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत नबाबपूरा, करण अपार्टमेंट, फ्लॅट नं. १, नागपूर येथे फिर्यादी प्रणव दत्तात्रय शेन्डे वय ३५ वर्ष हे त्यांचे वडील दत्तात्रय बाळकृष्ण शेन्डे वय ६२ वर्ष, लहान भाऊ कुशल उर्फ इंगा दत्तात्रय शेन्डे वय ३३ वर्ष असे एकत्र राहतात. घटनेवेळी फिर्यादीचा लहान भाऊ आरोपी कुशल याने वडील दत्तात्रय शेन्डे यांना त्याचे हात—पाय दाबण्यास सांगीतले. वडीलांनी त्यास नकार दिल्याने आरोपी कुशल याने वडीलांना शिवीगाळ करून त्यांचे छातीवर, पोटावर, डोक्यावर व पसलीवर, नाकावर हातबुक्की व लाथेने मारून गंभीर जखमी करुन त्यांना जिवानिशी ठार केले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक १८.०८.२०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. श्री बोयने यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री मुकुंद कमलाकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री हेमंत झा यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी सफौ. प्रमोद येवले व गणेश डफ यांनी काम पाहिले

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे जुनी कामठी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०८.२०२६ चे ०१.३० ते ०२.१५ वा. चे दरम्यान, जुनी कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, मकसुद हॉटेलजवळ, दरोगा मस्जिद रोड, कामठी येथे एका बर्गमन दुचाकी गाडी क्र. एमएच ४० डीजे ६२२२ वरील इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यास थांबवुन पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव फरहान खान आदील खान वय २२ वर्षे रा. पुरनसिंग सिरीया मैदानजवळ, इलाही कॉम्प्लेक्स समोर, कामठी, नागपूर असे सांगीतले. त्याची व वाहनाची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातील वाहनाचे डिक्कीत एक धारदार लोखंडी शस्त्र किंमती ५००/— रू. चे मिळून आले. आरोपीचे ताब्यातुन शस्त्र व दुचाकी वाहन असा एकूण ४०,५००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र घेवुन फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे जुनी कामठी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**१) पोलीस ठाणे धंतोली :–** दिनांक १३.०८.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत अंजनीय क्रिश बिल्डींग, कलर्स हॉस्पिटलचे मागे, धंतोली येथे असलेल्या सोळा माळयाचे इमारतीमध्यील १२ वे माळयावरील बालकनीमध्ये सोलर वायरींग लावण्याचे काम करतांना, विष्णु हिरालाल विश्वकर्मा वय २२ वर्षे, रा. ग्राम सोनवल, नौगढ, जि. सिदधार्थनगर, उत्तरप्रदेश ह.मु. प्लॉट क्र. १९, दुर्गानगर, बॅक कॉलनी, हुडकेश्वर, नागपुर याचा तोल गेल्याने तो आधी लिफ्टवर व तेथून खालचे फ्लोरवर पडल्याने गंभीर जखमी होऊन बेशुध्द झाला. त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि मिरा सोनुने यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बजाजनगर :–** दिनांक १३.०८.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बजाजनगर हद्यीत प्लॉट क्र. ७, बुटी ले आऊट, आरपीटीएस रोड, लक्ष्मीनगर येथील निर्माणाधीन इमारतीचे सहावे माळयावर सेंट्रीग काढण्याचे काम करतांना मजुर नामे रामदास बिरबल गजाम वय ३० वर्षे, रा. रोघा, लेंडेझारी, जि. भंडारा ह.मु. घटनास्थळी साईटवर, याचा तोल गेल्याने पाय घसरुन तो सुरक्षा जाळीवर पडला. मात्र जाळीचा जॉईन्ट फाटल्याने, तो खाली जमीनीवर पडून बेशुदध झाला. त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोउपनि विकास मेंढे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** सौ. सविता विवेक पाठक वय २८ वर्षे, रा. बेलदार नगर, हनुमान मंदीरजवळ, परतेकीचे घरी किरायाने, हुडकेश्वर, नागपूर ह्या दिनांक ०४.०८.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत राहते घरी काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांब, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट, केस–काळे लांब, अंगात–सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :–** सौ. मेघा विजय बावणे वय २५ वर्षे, रा. गली क्र. ५, कस्तुरबा नगर, जरीपटका नागपूर ह्या दिनांक ११.०८.२०२६ चे १३.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता मुलासह कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांब, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट, केस–काळे लांब, अंगात–सलवार सुट घातलेला आहे. भाषा–हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** कु. काजल दामेंद्र राऊत, वय २१ वर्षे, रा. प्लॉट क्र. ६३, जयवंत नगर, हुडकेश्वर, नागपूर ही दिनांक ०९.०८.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट, केस– काळे लांब, भाषा– मराठी/हिंदी बोलते.






सौ. सविता    सौ. मेघा व त्यांचा मुलगा    कु. काजल

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा. जिल्हा न्यायाधीश—१७, तथा अति. सत्र न्यायाधिश, नागपूर | ११८/ २०११ | कलम ३७२,३७३ भा.दं.वि. सहकलम ३,४,५ पिटा अॅक्ट | १) अंजु तक्की धनावत<br>२) कविता कल्लु कालखोर दोन्ही रा. दिंगाबर सावजीचे घरी किरायाने, गंगाजमुना वस्ती, लकडगंज, नागपूर<br>३) अनिता बापु कालखोर रा. बालाजी रोड, गंगाजमुना, लकडगंज, नागपूर<br>४) मंजु काला कालखोर रा. विमला बाई बिल्डींग, गंगाजमुना, नागपूर<br>५) प्रिया कल्लु कर्मावत रा. गंगाजमुना वस्ती, लकडगंज, नागपूर | ३१.०८.२०२६ |
| २ | मा. १५ वे सह दिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०५०३४३ /२००३ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | १) शेख नईम शेख अफझल वय ३१ वर्ष रा. शांतीनगर कॉलनी, देशी दारु दुकानाजवळ, नागपूर<br>२) प्रदीप उर्फ चिनी ध्रुवसिंग थापा वय २४ वर्ष रा. गोसेकरचे घरी किरायाने, शांतीनगर, लकडगंज, नागपूर. | २४.०८.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**